स्वेच्छा अनुदानांतर्गत गौण बांधकामे
योजनेस मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्र.मत्स्यवि-१९१०/५६६/प्र.क१०९/१०/पदुम-१३,
दिनांक:-१ सप्टेंबर,२०१०.
संदर्भ:-नियोजन विभागाचे पत्र क्र.जिवायो-१००९/प्र.क्र.२१३/का.१४८१,
दिनांक:-३०.१२.२००९.

***प्रस्तावना -:***

मत्स्यबीज उत्पादनाच्या क्षेत्रात स्वयंपूर्ण होण्यासाठी व इष्टतम प्रमाणात संचयनासाठी लागणाऱ्या मत्स्यबीज उत्पादनासाठी या योजनेअंतर्गत ४२ मत्स्यबीज केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. ही सर्व केंद्रे सुमारे २० वर्षापूर्वी बांधलेली आहेत. आधुनिक तंत्राचा वापर करुन मत्स्यबीज उत्पादन वाढविण्यासाठी २८ वर्तुळाकार उबवणी केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे.ही योजना १९८७-८८ पासून कार्यान्वित असून मत्स्यबीज केंद्राच्या/इमारतीच्या परिरक्षणाबाबतची अत्यावश्यक गौण बांधकामे या योजनेअंतर्गत हाती घेण्यात येतात.

तसेच विभागाची कार्यालये महाराष्ट्रातील सर्व जिल्हयात असून त्यांचे किरकोळ दुरुस्तीकरता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पुरेसा निधी उपलब्ध होत नाही. स्वेच्छा अनुदानांतर्गत गौण बांधकाम या योजनेअंतर्गत किरकोळ दुरुस्तीची कामे प्राथम्याने घेण्यात येतात. या योजनेअंतर्गत सदरची कामे करण्यात येतात, जेणेकरुन मत्स्यबीज उत्पादन केंद्राच्या कार्यक्षमतेत वाढ होण्यास मदत होते. त्यामुळे सदर योजनेसंदर्भात सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय**:-

या शासन निर्णयान्वये स्वेच्छा अनुदानअंतर्गत गौण बांधकामे ही राज्य स्तरीय योजना या पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत गौण बांधकामे प्रस्तावित करताना खालील निकषांचे /मार्गदर्शक सुचनांचे पालन करण्यात यावे.

१. - सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी मत्स्यबीज केंद्राच्या उत्पादकतेशी निगडीत दुरुस्ती कामे जसे तळी बांध बंदिस्ती, पाणीपुरवठा व्यवस्था, हॅचरी दुरुस्ती इ.प्राथम्याने गौण बांधकामांतर्गत प्रस्तावित करावी. तसेच उर्वरीत कामे उपलब्ध निधीनुसार समाविष्ट करावीत.

२. - दुरुस्ती करावयाच्या कामाच्या आवश्यक्तेबाबतची तपशीलवार टिपणी प्रस्तावासोबत जोडावी.

३. - कामाचे आराखडे व अंदाजपत्रकावर प्रतिस्वाक्षरी संबंधित सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी करावी.

४. - आर्थिक वर्षात निधी उपलब्धतेनुसार प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी प्राथम्य यादी तयार करुन मान्यता द्यावी व मान्यता दिलेल्या यादीनुसार सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी प्रस्तावित कामाचे आराखडे व अंदाजपत्रके सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तयार करुन घ्यावीत. -

५. - कामाचे आराखडे व अंदाजपत्रकास मत्स्यव्यवसाय विषयक तांत्रिक मान्यता संबंधित प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी द्यावी. तसेच कामाचे आराखडे व अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता संबंधीत कार्यकारी अभियंता यांनी द्यावी.

६. - प्रस्तावास वित्तिय व प्रशासकीय मान्यता वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.विअप्र-१०.१८/प्र.क७०/२००८/विनियम, दि.१५ मे, २००९ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीनुसार आर्थिक मर्यादेत वित्तिय व प्रशासकीय मान्यता प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी उपलब्ध तरतूदी पाहून द्यावी.

७. अधिक आर्थिक मर्यादेचे परिपूर्ण प्रस्ताव मूळ अंदाजपत्रके व आराखडे, तांत्रिक मंजूरी व शिफारीसह प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचकडे द्विप्रतीत सादर करावेत. आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी परिपूर्ण प्रस्तावांना वरील शासन निर्णयानुसार वित्तिय व प्रशासकीय मान्यता द्यावी.

८. मान्यता दिलेल्या प्रस्तावांसाठीचा आवश्यक तो निधी अर्थसंकल्प शाखेकडून संबधीत बांधकाम विभागाकडे वर्ग करावा.

९. अंदाजपत्रकातील कामनिहाय बाबींनुसार कामावरील खर्चाचा अहवाल वेळोवेळी संबंधित कार्यकारी अभियंता यांनी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना सादर करावा.

१०. -सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांनी कामाचा अहवाल वेळोवेळी संबंधित कार्यकारी अभियंता व प्रादेशिक उपआयुक्त, मत्स्यव्यवसाय यांना सादर करावा. संबंधित प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी कामानिहाय तपाशीलवार वर्ष अखेरीचा अहवाल आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई कार्यालयास सादर करावा.

११. -सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी कामानिहाय वर्षनिहाय होणाऱ्या सर्व प्रकारच्या बांधकामाच्या नोंदी नोंदवहीत ठेवाव्यात.

१२. - या योजनेचा खर्च मागणी क्रमांक एच -६-२४०५-मत्स्यव्यवसाय योजनांतर्गत योजना, ८००-इतर खर्च, (०१)-स्वेच्छा अनुदानातून वित्तिय व्यवस्था केलेली बांधकामे, २७-लहान बांधकामे या अर्थशिर्षाखाली उपलब्ध होणाऱ्या तरतूदीतून करण्यात यावा.

१३. - सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौ.संदर्भ क्र.१९९/१४३१/दिनांक.२६.८.२०१० अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

(प.श.अहमद)
उपसचिव,महाराष्ट्र शासन,
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

प्रति,
आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी
सर्व कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग
सर्व प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय/सर्व सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय
महालेखापाल(लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र-१,मुंबई/२-नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,/निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
सर्व कोषागार अधिकारी.
प्रधान सचिव(नियोजन,नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२/निवडनस्ती